आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२४ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सहकार आंदोलन आणि विज्ञान यांची सांगड घातल्यास सहकाराच्या माध्यमातूनच शेतकरी आत्मनिर्भर होईल, असा केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचा विश्वास

- भंडारा जिल्ह्यात आयुध निर्मिती कारखान्यात स्फोट झाल्यानं ७ जणांचा मृत्यू, ५ जखमी/ शोध आणि बचावकार्य सुरु

- वक्फ सुधारणा विधेयकाबाबतच्या संयुक्त संसदीय समितीची बैठक गदारोळामुळे स्थगित, विरोधी पक्षांच्या १० खासदारांचं निलंबन

**आणि**

- एसटीच्या प्रवासभाड्यात सुमारे १५ टक्के वाढ लागू, एक फेब्रुवारी पासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील होणार भाडेवाढ

**<><><><><><>**

सहकाराच्या माध्यमातूनच शेतकऱ्यांच्या उन्नतीचा मार्ग समृद्ध होऊन शेतकरी आत्मनिर्भर होईल, त्यासाठी शेतीला विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देणं आवश्यक आहे, असं केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक जिल्ह्यात मालेगाव तालुक्यातल्या अजंग इथं झालेल्या सहकार परिषदेत बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जय जवान- जय किसान या घोषणेला जय विज्ञानची जोड दिली. कृषी क्षेत्रासाठी विविध योजना सुरु केल्या, माती परीक्षणावर भर दिल्यानं शेतकऱ्यांच्या खर्चात बचत झाली, असं ते म्हणाले. आगामी काळात मृदा परीक्षण करणाऱ्या संस्थांना मदत केली जाईल, केंद्र सरकार

शेतकऱ्यांच्या पाठिशी राहील अशी ग्वाही त्यांनी दिली. राज्यात साखर कारखाना उद्योगाच्या सबलीकरणासाठी केंद्र सरकार पाठबळ देत आहे, असं त्यांनी सांगितलं.

अमित शहा यांच्या हस्ते मृदा परीक्षण प्रयोगशाळेचं तसंच बेळगाव मधल्या काजू उद्योगाचं दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करण्यात आलं. या कार्यक्रमाला केंद्रीय सहकार आणि हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अनेक मंत्री उपस्थित होते.

या कार्यक्रमानंतर अमित शाह यांच्या हस्ते मुंबईत आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष कार्यक्रमाचं उद्घाटन झालं. सहकार चळवळीच्या विस्तारासाठी शिस्त आणि व्यावसायिकता गरजेची असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. प्रत्येक व्यक्ती सहकार चळवळीत जोडला जाऊन खऱ्या अर्थानं सहकारातून समृद्धी आणण्यासाठी प्रयत्न करू, असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. प्राथमिक कृषी सहकारी संस्थांमध्ये व्यावसायिकता आणण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ नियुक्त करण्याचं आवाहन त्यांनी केलं. यावेळी अमित शहा यांच्या हस्ते २०२५ या चालू आंतरराष्ट्रीय सहकार वर्षातल्या कार्यक्रमाच्या दिनदर्शिकेचं आणि राष्ट्रीय शहरी सहकार वित्त आणि विकास महामंडळाच्या मुंबईतल्या कार्यालयाचं उद्घाटन झालं.

**<><><><><><>**

भंडारा जिल्ह्यात आयुध निर्मिती कारखान्यात स्फोट होऊन ७ जणांचा मृत्यू झाला तर ५ जण जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. य़ा दुर्घटनेच्या वेळी कारखान्यात असलेल्या इतर कर्मचाऱ्यांचा शोध सुरु आहे. स्फोटातल्या जखमींना भंडारा रूग्णालयात दाखल केलं आहे. घटनास्थळी पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत बचावकार्य सुरु आहे.

स्फोटात मृत्यू झालेल्या कामगारांच्या प्रति संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शोक व्यक्त केला आहे. या स्फोटात मृत्यू

झालेल्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><><>**

नागपुरात आयोजित ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५ या औद्योगिक महोत्सवात ५० हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले जाणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपुरात वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. हा महोत्सव ७ ते ९ फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. विदर्भाच्या औद्योगिक वाढीसाठी एक प्रमुख गुंतवणूक स्थळ म्हणून प्रोत्साहन देणं, बाजाराचा कल, आणि उदयोन्मुख संधींवर चर्चा केली जाणार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं. ६७० कोटी रुपयांचा मदर डेअरी चा प्रकल्प लवकरच नागपुरात सुरु होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

येत्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात नवी दिल्लीत होणारं संचलन पाहण्यासाठी महाराष्ट्रातून अनेक विशेष पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. राष्ट्रासाठी महत्वाच्या उपक्रमांमध्ये जनभागीदारी वाढवण्याच्या उद्देशानं देशभरातून एकूण १० हजार व्यक्तींना आमंत्रण देण्यात आलं आहे. यामध्ये उत्कृष्ट कार्य करणारे जलदूत, प्राथमिक कृषी पतसंस्थांचे प्रतिनिधी, उत्कृष्ट जल समित्या, स्वयंसहायता गट, कारागीर, विविध योजनांचे लाभार्थी, सरपंच, उत्कृष्ट स्टार्ट अप्स आणि इतर अनेक क्षेत्रातल्या प्रतिनिधींचा समावेश आहे. यापैकी अनेक जण दिल्लीला पहिल्यांदाच जाणार असून या सोहळ्यासाठी बोलावल्यामुळे त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

या सोहळ्यासाठी पालघर जिल्ह्यातल्या मोहिते दांपत्याला आमंत्रित करण्यात आलं आहे. विश्वास मोहिते हे प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचे लाभार्थी आहेत. आकाशवाणीशी बोलताना त्यांनी सांगितलं...

**होल्ड बाईट - मोहिते**

अकोला शहरातली दोन मुलंही या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. आनंद खोडे आणि सुमित पथरोड अशा या मुलांची नावं आहेत. सुमित हा प्रधानमंत्री बँड पथकात जिल्ह्याचं नेतृत्व करणार आहे तर आनंद हा राष्ट्रीय छात्रसेनेच्या पथकाचं नेतृत्व करणार आहे. या दोघांचेही वडील अकोला महापालिकेत सफाई कर्मचारी म्हणून काम करतात.

**<><><><><><>**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, उद्या संध्याकाळी ७ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्राला उद्देशून संदेश देणार आहेत. त्याचं थेट प्रसारण होणार असल्यानं, आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन दररोज संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या, संध्याकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होईल.

तर, राष्ट्रीय मतदाता दिनाच्या पूर्वसंध्येला, आज, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचा संदेश रात्री ८ वाजता प्रसारित होणार आहे. त्यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन दररोज रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र आज, रात्री ८ वाजून २० मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकासाठी स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत गदारोळ झाल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांच्या १० खासदारांना समितीतून निलंबित करण्यात आलं आहे. तृणमूल

काँग्रेस, डीएमके, काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या खासदारांचा यात समावेश आहे. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांच्या विरुद्ध असंसदीय भाषा वापरल्याचा आरोप भाजपानं केला. तर बैठकीचा विषय अचानक बदलल्याचा आणि दिल्ली विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून बैठकीत मूळ मुद्द्यांचा समावेश न केल्याचा आरोप बॅनर्जी यांनी केला. या संयुक्त संसदीय समितीमध्ये लोकसभेतले २१ आणि राज्यसभेतल्या १० खासदारांचा समावेश आहे.

**<><><><><><>**

एसटी महामंडळानं प्रवासभाड्यात केलेली १४ पूर्णांक ९७ शतांश टक्के दरवाढ आज पासून लागू असून, एक फेब्रुवारी पासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील भाडेवाढ होणार आहे. ही तीन रुपयांची असेल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं. जुन्या योजना आणि सवलती कायम राहणार असून, २ हजार कोटी रुपयांची देणी, तसंच कर्मचाऱ्यांचे पगार, या आणि इतर कारणांमुळे भाडेवाढ अपरिहार्य असल्याचं त्यांनी सांगितलं....

**बाईट..प्रताप सरनाईक परिवहन मंत्री ( १६ सेकंद)**

**<><><><><><>**

भारत ऊर्जा सप्ताह २०२५ हा जागतिक स्तरावरचा दुसरा सर्वात मोठा ऊर्जा कार्यक्रम असेल, अशी माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दिली आहे. ते आज मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. जवळपास १ लाख चौरस मीटरपेक्षा अधिक जागेत या कार्यक्रमाचं आयोजन केलं जाईल आणि त्यात विविध सत्रांचा समावेश असेल, असंही ते यावेळी म्हणाले. 'भारताची अत्यंत यशस्वी 'प्रधानमंत्री उज्ज्वला योजना' या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू असेल.

पुढच्या महिन्यात ११ ते १४ फेब्रुवारी दरम्यान नवी दिल्लीत या कार्यक्रमाचं आयोजन केलं जाणार आहे. या कार्यक्रमात १०५ चर्चा सत्रं, ७० हजारहून अधिक प्रतिनिधी तसंच, ब्रिटन, रशिया, जपान, जर्मनी आणि नेदरलँड्स सारख्या देशांची पथकं सहभागी होतील. या कार्यक्रमात हायड्रोजन, अक्षय्य उर्जा, जैवइंधन आणि पेट्रोकेमिकल्स यांच्याविषयी चर्चा होतील, अशीही माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><><>**

येत्या दोन दिवसांत राज्यातलं हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><><>//**